# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २१०-२३** **दिनांक :- ०८/०७/२०२३**

## गृह मंत्रालय, भारत सरकारचे Indian Cybercrime Coordination Centre (I4C) यांचेकडून मि.भा.व.वि आयुक्तालयातील सायबर गुन्हे कक्षाच्या क्रिप्टोकरन्सी केस तपासाबाबतची दखल.

## संपुर्ण भारतातील सायबर पोलीस ठाणे व तपास यंत्रणांकरीता सादरीकरण.

**Indian Cybercrime Coordination Centre (I4C)** स्थापना गृहमंत्रालय भारत सरकार यांचेद्वारे करण्यात आलेली आहे. सदरची संस्था देशात तपासी यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यासाठी व सायबर गुन्हयांचा प्रभावी तपास करण्याकरीता एक फ्रेमवर्क व इको-सिस्टम प्रदान करते. तसेच देशातील सायबर गुन्हयांना आळा घालण्याकरीता नोडल एजंसी म्हणुन काम करते. देशातील सायबर गुन्हयांच्या उत्कृष्ट तपासाबाबतचे सादरीकरण करण्याचा उपक्रम या संस्थेमार्फत राबविण्यात येत असतो.

भारत देशामध्ये यापुर्वी अशा प्रकारे क्रिप्टोकरन्सी केसबाबत कोणत्याही तपास यंत्रणांना तपास करुन फसवणूक झालेली क्रिप्टोकरन्सी तक्रारदार यांना भारत देशाबाहेर विशेषतः चायनीज देशातील नागरिकांचे वॉलेट मधुन परत मिळवून देण्यास यश आले नव्हते.

**मि.भा.व.वि आयुक्तालयातील सायबर गुन्हे कक्षाच्या क्रिप्टोकरन्सी केस तपासाबाबतची दखल** वर नमुद संस्थेने घेवून सदर तपासाबाबत संपूर्ण देशभरातील तपासी यंत्रणांना मार्गदर्शन करण्याबाबतच्या सूचना आयुक्तालयास प्राप्त झालेल्या होत्या.

त्याअनुषंगाने सदर केसबाबतची हकिगत की, सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार श्री. योगेश कांतीलाल जैन, रा. जे.पी.नॉर्थ, विनय नगर, मिरारोड (पुर्व), ता. जि. ठाणे यांची दिनांक ०४/०५/२०२२ रोजी त्यांचे सोबत क्रिप्टोकरन्सी गुंतवणूकीबाबत फसवणूक झाल्याबाबतची लेखी तक्रार प्राप्त झालेली होती.

सदर तक्रारीमध्ये तक्रारदार श्री. योगेश जैन यांनी नमुद केलेले होते की, त्यांना फेब्रुवारी २०२२ मध्ये 'BTC INDIA GROUP-1' नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आले होते, व्हॉट्सॲपच्या एका ॲडमिन नामे ॲमी ने ग्रुप तयार केला होता. तिचा नंबर +852-46849180 (HongKong) असा होता. दिनांक ०८/०२/२०२२ ते दिनांक १४/०५/२०२२ या कालावधीत BTC INDIA GROUP चा व्हॉट्सॲप ग्रुपवरुन ॲडमिन ॲमी यांनी तिच्या मो.क्र. +852- 46849180 वरुन संपर्क करुन इन्व्हेस्टमेंट बाबत माहिती देवून BTC कॉईन ट्रेडींग ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. BTC कॉईन ट्रेडींग बाबत सिग्नल देवून नफा कमविण्याचे आमिष दाखवून ट्रेडींग-इन्वेस्टमेंट करण्यास भाग पाडले. त्यावर विश्वास ठेवून तक्रारदार श्री. योगेश यांनी Binance App वरुन 33,65,660/- रुपये खर्च करुन क्रिप्टो करन्सी 39,596 USDT खरेदी करुन ॲमी हिच्या सांगण्यावरुन http://trade.mpisvip.com मधून BTC कॉईन UUID : 254907380217860096 ॲपमध्ये

ट्रान्सफर केले. दिनांक ०४ मे २०२२ रोजीपासून BTC कॉईन ॲप ऑपरेट होत नसल्याचे श्री. योगेश यांचे लक्षात आले. तसेच त्याबाबत त्यांनी ॲमी हिच्याकडे चॅटींगवर विचारणा केली असता कोणतेही उत्तर दिले नाही. व तिचा संपर्क नॉट रिचेबल येत होता. त्यावेळी श्री. योगेश यांचे लक्षात आले की, BTC कॉईन ॲप मध्ये गुंतवणूक केलेल्या रक्कमेची फसवणूक झालेली आहे.

सदर तक्रारीवरुन सायबर गुन्हे कक्ष यांनी तात्काळ तपास सुरु करुन फसवणुक झालेली क्रिप्टो करन्सीचा तांत्रीक तपास सुरु केला. तसेच तांत्रीक विश्लेषणानंतर व्यवहार थांबविण्यासाठी तात्काळ संबंधीत Binance व Gate io या क्रिप्टो करन्सी प्लॅटफॉर्म यांचेशी ईमेल/पत्रव्यवहार करण्यात आला. Binance व Gate io यांचेकडुन क्रिप्टोकरन्सी बॅलेन्स बाबत कोणतेही उपयुक्त माहिती प्राप्त झाली नाही. परंतू क्रिप्टोकरन्सी चे ट्रेसिंगचे सविस्तर विश्लेषणावरुन **OKX** (OKX is a global cryptocurrency spot and derivatives exchange) seychelles Country (East Africa) हया प्लॅटफॉर्मवरील १ संशयीत वॉलेट निष्पन्न करण्यात आले. तसेच संबंधित **OKX** क्रिप्टोकरन्सी एक्सचेंजला पत्रव्यवहार करण्यात आला. सदरचे संशयित वॉलेट हे एका चायनीज नागरिकांचे नावाने असल्याचे निष्पन्न झाले.

श्री. योगेश जैन यांचे तक्रारीवरुन सविस्तर प्राथमिक चौकशी पूर्ण करुन सायबर गुन्हे कक्ष यांनी दिलेल्या अहवालावरुन काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. २०५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये दिनांक १६/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तक्रारदार यांना त्यांची फसवणूक झालेली रक्कम परत मिळण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज करण्याबाबत माहिती देण्यात आली होती. मा. न्यायालयामध्ये सदर प्रकरणामध्ये सायबर गुन्हे कक्षाकडून करण्यात आलेला तपास ग्राह्य ठरला. सदर तपासामध्ये तक्रारदार यांचेकडून फसवणूक झालेले क्रिप्टोकरन्सी हे चायनीज नागरिकांचे वॉलेट मध्ये जमा झाल्याचे व तक्रारदार यांना संपर्क करणारे सर्व संपर्क क्रमांक हे हॉंगकॉंग देशामधून वापरात येत असल्याचे मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात आले.

मा. न्यायालयाने सायबर गुन्हे कक्षाचे सविस्तर अहवालावरुन **OKX** ला गोठविलेली वॉलेट मधील ( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR) रुपये मुळ तक्रारदार यांना परत देण्याबाबत सविस्तर आदेश दिले त्याप्रमाणे दिनांक १३/०६/२०२३ रोजी मुळ तक्रारदार यांचे खात्यामध्ये ( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR) परत मिळालेले आहेत.

**सायबर गुन्हे कक्ष यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करुन चायना देशामधील नागरिकाने भारतीय नागरिकांची फसवणूक केलेली रक्कम सातत्यपूर्ण १३ महिने तपास करुन तक्रारदार यांना परत मिळवून दिलेली आहे.**


वर नमुद **तपासाबाबत दिनांक ०७/०७/२०२३ रोजी १६.०० वाजता आयुक्तालयामार्फत सादरीकरण आयोजित करण्यात आले होते.** सदर केसच्या सादरीकरणामध्ये भारत देशातील ३०० हुन अधिक सायबर पोलीस ठाणे, क्रेंद्रिय तपास यंत्रणा, राज्यातील प्रमुख तपास यंत्रणा यांनी सहभाग घेतला. सदर सादरीकरणामध्ये मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, सायबर गुन्हे कक्षाचे तपासी अधिकारी यांनी भारत देशातील सर्व तपासी यंत्रणा यांना क्रिप्टोकरन्सी तपासाबाबत सविस्तर माहिती दिली.


सदरची कामगिरी श्री. मधूकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे)

यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे शाखेचे पो.नि.श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.नि. प्रसाद शेनोळकर, पो.अंम.प्रविण आव्हाड यांनी केली आहे.







CONTENTS
INCIDENT REPORT
03 ANALYSIS
04 INVESTIGATION/ EVIDENCE COLLCTION
06 COM. MISTAKES/ LEARNING


6:53
Webex
36:25
CP MBVV MS is sharing.
INVESTIGATION (Progress)
Crime Registration then Victim Apply in Hon. Court. Upon receiving court order OKX transferred USDT 40K to victim's OKX Account.
MAR TO JUN 2023
Cyber Cell- MBVV sent freeze order and revised tracing report prepared by Private Tool in Oct-2022. Okx provided KYCs and agreed to refund upon getting court order
2nd CORRESPONDENCE WITH OKX
NOV 2022 TO MAR 2023
Cyber Cell- MBVV sent freeze order and tracing report version 1. No reply from OKX
1st CORRESPONDENCE WITH OKX
MAY 2022
Cyber Cell- MBVV sent freeze order and tracing report. Binance shared their own analysis but not scammer KYC. Provided Nearest wallet of OKX
CORRESPONDENCE WITH BINANCE
MAY TO OCT 2022
MAY TO Aug 2022
CORRESPONDENCE WITH GATE.IO
Cyber Cell- MBVV shared freeze order and tracing report. Gate.io provided KYC which was not so useful. No reply from Gate after Oct.22
April - May 2022
VICTIM FILED COMPLAINT
Yogesh filed complaint to MBVV Cybercrime cell alongwith tracing report made by Private Tool (Binance, Okx and Gate io)
FEB TO MAR 2022
VICTIM CRYPTO TRADING
Amy (scammer) met Yogesh on Whatsapp and told him to invest in fake platform. Victim invested around USDT 40K between Feb and Mar 2022.
CP MBVV MS (cohost)

-----ooo-----